**MHST080003002013**

**रे. दि. मु. क्रमांक ७३/२०१३ मधील नि.क्र. ५२ खालील आदेश.**
**किसन धोंडीबा ठोंबरे (मयत वारस) विरुध्द रामदास सोमा माने वगैरे**
**आदेश पारित दिनांक ०३.११.२०२३**

---

प्रस्तूतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. १ रामदास सोमा माने यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, प्रस्तूतचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ रामदास सोमा माने हे दिनांक २३.०१.२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. १ यांना १–अ ते १–इ हे वारस आहेत. सदरील मयत प्रतिवादीचे वारस दाव्याचे कामी सामील होणे आवश्यक आहे. कै. रामदास सोमा माने यांचे वारस दाव्याचे कामी सामील करणेसाठी त्यांचे नावास कंस करणेत येवून त्यापूढे मयत लिहिणे आवश्यक आहे. प्रतिवादीचे वारस सामील केलेने दाव्याचा गुणावगुणावर निर्णय करणेस मदत होणार आहे. तसेच मयत प्रतिवादीचे वारस वादी मुदतीत पटलावर घेत आहेत. सदरील वारस पटलावर आलेने वादी अगर प्रतिवादीचे नुकसान संभवत नाहीत. सबब, प्रतिवादी क्र. १ यांचे नावास कंस करणेत येवून त्याचे नावापुढे मयत शब्द लिहणेस व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस पटलावर घेणेची परवानगी वादीने मागितली आहे.

०२. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींतर्फे असे म्हणणे दाखल की, सदरचे प्रतिवादी क्र. १ यांचे वारस योग्य त्या कॉस्टवर रेकॉर्डवर घेणेकरिता त्यांची काही हरकत नाही.

०३. वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ रामदास सोमा माने हे दिनांक २३.०१.२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. १ रामदास सोमा माने यांना १–अ) लक्ष्मीबाई रामदास माने, वय – ५६ वर्षे, धंदा – घरकाम, १–ब) मुकुंद रामदास माने, वय – ४५ वर्षे, धंदा – शेती १–क) अंकुश रामदास माने, वय – ४२ वर्षे, धंदा – शेती, अ.क्र. १–अ ते १–क सर्व रा. पाडेगांव, ता. खंडाळा, जि. सातारा, १–ड) बकूळा बाळासो करनोर, वय – ३७ वर्षे, धंदा – घरकाम, रा. निमगांव खलु ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर, १–इ) राणी मधुकर धायगुडे, वय – ३५, धंदा – घरकाम, रा. पिंपरे बु. (गिरमेवस्ती)

ता. खंडाळा, जि. सातारा  असे वारस आहेत. त्याच्या पुष्ठ्यर्थ वादीतर्फे मुखत्यार विजय वामन जाधव यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ५३ वर दाखल केलेले आहे.  सदर दाव्यामध्ये दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. वरील कारणांचा विचार करून मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५२ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |
| ४. | खर्चाबाबत काही आदेश नाही. |

Sd/-
(के. ए. पट्टेबहादुर)
दिनांक – ०३.११.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा
लघुलेखकाचे नाव – सौ. सुवर्णा संकेत शिंदे

Sd/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेखक (ग्रेड – ३)